# निष्कर्ष

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## - निष्कर्ष -

म्हैशाळ येथील विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीच्या सन १९८५ पासून ते सन १९८९ पर्यन्तच्या अभ्यास पाहणीत खालील निष्कर्ष आढळून आले.

एक: म्हैशाळ येथील दलीतांच्या जमिनी सावकारांकडे गहाण पडल्या होत्या तर कांहीच्या जमिनी पडीक पडलेल्या होत्या त्यामुळे दलीतांना " रयतेच्या " शेतीमध्ये मजुरीस जावे लागत होते असे अभ्यासात आढळून आले.

दोन: दूध सोसायटीमुळे दलीतांना दुभती जनावरे कर्जरूपाने मिळू लागल्याने दूध व्यवसायाचा स्वतंत्र धंदा मिळाला. त्यामुळे आर्थिक मदत दलीताना होऊ लागली. दूध व्यवसायामुळे दलीतांना आर्थिक फायदा झाला, परंतु दूध व्यवसायामुळे दलीतांच्यामुले शिक्षणापासून वंचित झाली, तसेच कांहीनी अर्ध्यावरच शाळा सोडल्याचे पाहणीत आढळून आले.

तीन: विठ्ठल सामुदायिक सहकारी शेती सोसायटी सन १९६९ मध्ये स्थापन केली. त्यामुळे दलीतांच्या शेतीत सुधारणा झाली. पडीक जमिनी कसण्यास सुपिक केल्या तसेच दलीतांच्या जमिनीमध्ये उत्पादनही बऱ्यापैकी होऊ लागले, त्याचा परिणाम दलीतांचा आर्थिक परिस्थितीत फरक जाणवू लागला परंतु दलीतांचा सर्वांगीण विकास झालेला नाही.

चार: विठ्ठल संयुक्त सहकारी सोसायटीला सन १९७० पासून ते १९७८ पर्यंत नफा झाला. परंतु सन १९८३ मध्ये वादळामुळे द्राक्ष बाग कोसळली, त्यामुळे सोसायटीचे लाखो रुपयांचे नुकसान झाले, असे सन १९८३-८४

च्या वार्षिक अहवालात सोसायटीने नमूद केले. आमच्या पाहणीत प्रत्यक्ष निरीक्षणात व अभ्यासात असे आढळून आले की व्यवस्थापनाच्या ढिलाईमुळे तसेच हलक्या प्रतीचे साहित्य वापरल्याने द्राक्ष बाग कोसळली असावी कारण त्याच काळात इतर सवर्णांच्या बागा म्हैशाळमध्ये कोसळल्या नाहीत, व्यवस्थापनास कारणे विचारले असता समाधानकारक उत्तरे मिळू शकली नाहीत. वरील विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की व्यवस्थापनातील दोषामुळे सोसायटीची बाग कोसळली, त्यामुळे सोसायटीचे लाखो रुपयाचे नुकसान झाले. एकंदर त्याचा परिणाम सोसायटीवर झालेला दिसतो.

पाच: सोसायटीच्या शेतीच्या एकरी उत्पादनापेक्षा म्हैशाळ येथील वैयक्तीक सवर्णांच्या शेतीतील एकरी उत्पादनापेक्षा जास्त आहे. विशेषत: सोसायटीच्या आधुनिक तंत्रज्ञान रासायनिक खते, बी-बियाणे, पाणी पुरवठा सोयी, औषधे ट्रॅक्टर, इत्यादी सुविधामुळे सोसायटीच्या शेतीमधून उत्पादन वाढलेले नाही. उलट वैयक्तीक शेतीमधून एकरी उत्पादन जास्त काढले जाते. यावरून असा निष्कर्ष निघतो की सोसायटीचे व्यवस्थापनात ढिलाई तसेच सभासदांमध्ये सोसायटीविषयी आस्था तसेच श्रम करण्याची वृत्ती कमी आहे त्यामुळे आपलेपणाची भावना कमी झालेली दलितांमध्ये दिसते.

सहा: विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीत दलीत सभासदांची आपल्या जमिनी समाविष्ठ केल्या. त्यामध्ये ज्या सभासदांची जमिन पाच एकरापर्यन्त आहे, अशांच्या जमिनी सुपिक, कसदार, बनलेल्या आहेत. तसेच सोसायटीने अशा जमिनीवर नगदी पिके घेतल्याचे व द्राक्षबागा लावल्याचे पाहणीत दिसून आले. तसेच तीन ते पाच एकरापर्यन्त

असणा-या सभासदांची जमिनी सुपिक व बागायती क्षेत्र वाटवल्याचे दिसले. बहुसंख्य सभासदांच्या जमिनी अर्ध्या एकरापर्यन्तच आहेत. अशा सभासदांच्या जमिनीवर कडधान्ये, ज्वारी इत्यादी पिके घेतल्याचे पाहणीत आढळून आले.

सात: दलीतांच्या जमिनी एकत्र करुन सोसायटीच्या व्यवस्थापनाद्वारे कसल्या जाऊ लागल्या परंतु दलीतांना जमिनीचा खंड मात्र असमान वाटला जातो. सोसायटीच्या उद्दीष्टानुसार व ध्येय धोरणानुसार जमिनीचा खंड वाटला जात नाही. तसेच जमिनीचा खंड जमिनीच्या प्रकारानुसार कमी जास्त प्रमाणात वाटला जातो. पूर्वी सभासदाना एकरी ३०० रुपये एवढा मिळत होता. सध्या जमिनीचा खंड ५०० रुपये एवढाच मिळतो. एकरी उत्पादन पाहता खंड फारच कमी दिला जातो हे स्पष्ट समजते.

आठ : विठ्ठल सामुदायिक शेती सोसायटीचे व्यवस्थापन सैध्दांतिक लोकशाही तत्वानुसार चालवले जाते, परंतु पाहणीत असे आढळून आले की बहूसंख्य सोसायटीचे सभासद अशिक्षीत असल्याने त्यांच्या जाणिवात जागृकता आलेली नाही. त्यामुळे ख-या अर्थाने लोकशाही सहकारी तत्वानुसार सोसायटीचे व्यवस्थापन चालते असे दिसत नाही.

नऊ : सोसायटीत ज्या सभासदानी दोन ते पाच एकरापर्यन्त जमिनी समाविष्ठ केल्या आहेत अशा मुठभर सुशिक्षीत सभासदांचा व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणात सहभाग असल्याचे आढळून आले.

दहा: विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीच्या अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे तसेच असमान खंड वाटप इत्यादी कारणामुळे सन १९८९ मध्ये - सोसायटीतील दहा सभासदांनी प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा

दिला तसेच सोसायटीकडून आपल्या जमिनी ही काढून घेतल्या आहेत हे आमच्या अभ्यासात आढळून आले.

अकरा: विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीच्या व्यवस्थापनाच्या कार्यकारिणीत सभासदास नव्याने संधी प्राप्त होऊ दिली जात नाही तसेच तरुणांना नेतृत्वात वाव दिला जात नाही. आजपर्यन्तच्या सोसायटीच्या कार्यकारिणी त्याच त्या सभासदांस पुन्हा पुन्हा नव्याने संधी प्राप्त करुन दिल्याचे आढळून आले.

बारा: सोसायटीच्या व्यवस्थापनाद्वारे शेतीचे नियोजन केले जाते, त्यामुळे व्यवस्थापन सांगेल त्या सभासदास शेतमजुरास शेतीत काम मिळते शेती सोसायटी सर्व सभासदांना एक वेळेस काम देऊ शकत नाही. त्यामुळे व्यवस्थापन कामाचे वाटपात स्वयंनिर्णयाद्वारे व - आपल्याला अनुकूल असणाऱ्या सभासदांना काम देते. त्यावेळी व्यवस्थापन आर्थिक परिस्थिती व गरज लक्षात घेऊन कामाची वाटणी करीत नाही असे पाहणीत आढळून आले.

तेरा : विठ्ठल संयुक्त शेती सोसायटीच्या खंडाविषयी सभासदांमध्ये नाराजी दिसते. जमिन ओलिताखाली आल्याने तसेच आधूनिक पध्दतीची शेतीमुळे उत्पादनात वाढ झाल्याने त्या प्रमाणात जमिनीचा खंड मिळावा असा सभासदांची तक्रार दिसून आली. एकरी दोन ते तीन हजार रुपये खंड देण्यास कांही हरकत नाही असे इतर शेतकरी सांगतात परंतु व्यवस्थापन एकरी पाचशे रुपये खंड देतात यावरुन सभासदांची फसवणूक होते हे दिसते.

चौदा: विठ्ठल संयुक्त शेती सोसायटीच्या सन १९८५ ते १९८९ पर्यन्तच्या शैक्षणिक पाहणीत असे आढळून आले की दलीतांच्या एकूण मुलात ४०% मुले

प्राथमिक व माध्यमिक शाळेत जातात. परंतु अलिकडे पाहिले असता महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुले नाहीत दलीत सभासदांच्या मुलामध्ये फक्त दोनच मुले महाविद्यालय शिक्षण घेतात. यावरुन असा निष्कर्ष निघतो की सोसायटी स्थापन होऊन वीस वर्षे झाले तरी म्हैशाळ येथील दलीतांच्यामध्ये शैक्षणिक विकास झालेला नाही. सोसायटीने सुरुवातीच्या काळात शैक्षणिक विकासाचे कार्य केले नाही. परंतु - अलिकडच्या चार पाच वर्षात दलीतांची मुले प्राथमिक शाळेत व माध्यमिक शाळेत जाऊ लागली. आहेत. तसेच शाळा न शिकणा-यांची संख्या ५०% पर्यन्त आहे. याचे कारण म्हणजे दूध सोसायटीने दलीतांना दूधाची जनावरे देवून दूध व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. तसेच शेती प्रकल्पामुळे बहूसंख्य मुले जनावरांची देखभाल तसेच आई वडीलांच्या मदतीसाठी शेतीत काम करु लागली.

पंधरा : म्हैशाळमधील सोसायटीच्या सभासदामध्ये देवदासीची प्रथा थोडीफार कमी झाली. परंतु देवदासी प्रथा पूर्णपणे बंद झालेली नाही. आजही दलीत व त्यामधून देवदासी डोक्यावर जग घेऊन फिरताना दिसतात. सोसायटीने देवदासी निर्मुलनाचा फारसा प्रयत्न केलेला दिसत नाही. यावरुन दलीतामध्ये देवदासीची प्रथा नष्ट झालेली नाही हे पाहणीत आढळून आले.

सोळा : म्हैशाळ येथील दलीतांच्या घरांच्या पहाणीत असे आढळून आले की बहूतांश दलीतांची घरे जुन्या पध्दतीची देशी कौलारु व पाऱ्याची असलेली दिसली. वीस वर्षे सोसायटी स्थापन होऊन झाले तरी घरांच्या रचनेत फारसा फरक पडलेला आढळला नाही. घरामध्ये सुख सुविधा नाहीत तसेच आधूनिक पध्दतीची घरे निर्माण झालेली

नाहीत वरील निष्कर्षावरून असे समजते की दलीतांचा आर्थिक विकास फारसा झाला नाही.

सतरा : म्हैशाळ दलीतामध्ये विकासाची सुरुवात दूध व्यवसायापासून झाली. आजपर्यन्त दलीतांच्या घरासमोर गाई-म्हैशीसाठी गोठा नसलेला दिसतो. कांही थोडया सभासदांच्या घरासमोर पाल्याचे गोठे दिसले. परंतु बहूसंख्य सभासदांना जनावरांसाठी गोठा नसलेला पाहणीत दिसून आले.

अठरा : सोसायटीने दलीत सभासदांसाठी दहा वर्षापूर्वी मागासवर्गीय घर निर्माण संस्था स्थापन केली आहे. त्याद्वारे एकूण १५२ घरकुले बांधण्याचे स्वप्न समोर होते, परंतु दहा वर्षात फक्त दहा घरांची आखणी केली प्रत्यक्षात चार च घरे बांधल्याचे सभासदांनी सांगितले यावरून असा निष्कर्ष निघतो की गृहनिर्माण सोसायटीच्या कारभारात सभासदांचा अविश्वास तसेच व्यवस्थापनात दिलाई दिसून येते.

एकोणीस: विठ्ठल संयुक्त शेती सोसायटी स्थापन झाल्यापासून दलीतांच्या आहारात बदल झालेला दिसत नाही. त्यांना सकस आहार आजपर्यन्त मिळालेला नाही. कारण बहुसंख्य सभासदांना साधे जेवण मिळते. शरीरास लागणारे पुरक अन्न मिळालेले नाही. असे सभासदांच्या पाहणीत आढळून आले.

वीस: म्हैशाळ येथील सार्वजनिक ठिकाणची अस्पृश्यता कमी झालेली आहे. परंतु वयक्तीक खाजगी जीवनात अस्पृश्यता पाळल्याचे दिसते. सवर्णाच्या लग्न समारंभात दलीतांसाठी वेगळ्या जेवणाच्या पंगती बसवतात तसेच सवर्णाच्या विहरीत पाणी भरु दिले जात नाही.

वरील विवेचनावरून खाजगी जीवनात उच्च वर्णीयांनी अस्पृश्यता पाळल्याचे सभासदांनी सांगितले.

एकवीस: म्हैशाळ येथील दलीत दलीतेत्तरांमध्ये सामंजस्य प्रस्थापित झाल्याचे अभ्यासक सांगतात परंतु आमच्या पाहणीत व अभ्यासात दलीत - सवर्णामध्ये सामाजिक एकता, सहकार्यनिर्माण झालेले नाही. त्यांच्या मध्ये जातीय तणाव निर्माण झालेचे दिसले कारण म्हैशाळमध्ये अलिकडेच जातीयतेवर आधारित, शिवसेना, हिंदूएकता, दलीत पँथर वीर सेवा दल सारख्या संघटना स्थापल्याने दलीत व दलीतेत्तरांमध्ये सामंजस्य, एकात्मता निर्माण झालेली नाही, असे पाहणीत आढळून आले.

बावीस: सोसायटीच्या दलीत इतर दलीतांमध्ये बेटी व्यवहार होतो नाही हे पाहणीत आढळून आले. उदा. चांभार, मांग, महार, ढोर, भंगी, इतर दलीतांमध्ये बेटी व्यवहार होत नाही. तसेच त्यांच्यामध्ये श्रेणी रचना निर्माण झाल्याने उच-निच श्रेष्ठ कनिष्ठ चा तरतम भाव निर्माण झालेला दिसतो.

तेवीस: विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीने म्हैशाळमधील इतर दलीत सवर्णामध्ये तसेच सोसायटीच्या सभासद दलीतांमध्ये सामाजिक बंधूभाव निर्माण झालेला नाही असे आढळून आले.

चोवीस :विठ्ठल संयुक्त सहकारी सोसायटीने दलीतांना आधुनिक शेती करण्याचे कसब शिकवले, परंतु दलीतांमध्ये आधुनिक जाणीवांचा विकास केला नाही उलट जुन्या पारंपारीक अध्यात्मिक दैववादात बंदीस्त केल्याचे दिसते कारण म्हैशाळ येथील दलीतांना डॉ.

आंबेडकरांच्या सनतेच्या चळवळीचा प्रसार संपूर्ण महाराष्ट्र झाला परंतु म्हैशाळ येथील सोसायटीच्या दलीतांमध्ये झालेला दिसला नाही.

पंचवीस: आजपर्यन्त पिठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीने म्हैशाळच्या दलीतांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, संकल्पनेच्या लोकशाही भांडवलशाहीच्या गुलामगिरीच्या बोखडातून पूर्णपणे सुटका केली नाही असे आमच्या पहाणीत दिसून येते.

सव्वीस: एकंदर दूध प्रकल्पाद्वारे मधुकरराव देवल यांनी दलीतांच्यामध्ये रचनात्मक कार्याची सुरुवात केली, त्यांनी रचनात्मक कार्याद्वारे दलीतांमध्ये विश्वास, आदर निर्माण केला, त्याद्वारे दलीतांमध्ये संघटन घडवून सहकारी सामुदायिक शेती सोसायटी स्थापन केली. वरील विवेचनावरून असे सांगता येईल की देवलांनी दलीतामध्ये नवा बाणा निर्माण करून त्यांच्यात रचनात्मक विचारांचा कार्यात्मकतेचा ठसा उमटून दलीतांमध्ये आपल्या कार्याचे मुल्य उंचावले व आपल्या कार्याची सिध्दी प्राप्त केली असे पाहणीत आढळून आले.

कोणताही विकास साधण्यासाठी परिवर्तन घडवून आणण्यासाठी साधारणत: दोन प्रकारचे डावपेच आखले जातात. एक म्हणजे कोंडीत सापडलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी बाहेरच्या व्यक्तीचे "मसिहा " म्हणून हस्तक्षेप या परिवर्तनाच्या टप्प्यात बाहेरून हस्तक्षेप करणारा 'हिरो' ठरतो परिवर्तनाच्या सगळ्या कक्षा त्याच्याभोवती फिरत असतात. यामध्ये संघर्षाला, लोकांच्या क्रांतीकारी जाणिव निर्मितीलाच त्यानुसार प्रश्न सोडविण्यासाठी क्रांतीकारी संघटनेला वाव नसतो. सर्व कांही नायकच अशा प्रकारची कल्पना या डावपेचात असते. या मार्गात जे परिवर्तन होत असता ते दुसऱ्याच्या सौजन्याने झालेले असते.

दुसऱ्या प्रकारच्या मार्गामध्येसुध्दा बहुदा 'नायक' असतात. परंतु 'नायक' कोंडीत सापडलेल्या समाजातूनच असतात किंवा ते बाहेरील सुध्दा असतात परंतु या नेत्यांचा भर क्रांतीकारी विचार, प्रबोधन व संघटना या गोष्टीवर अधिक असतो. यांना समग्र परिवर्तन आवश्यक असते व या परिवर्तनासाठी आवश्यक असणारी परिस्थिती निर्माण करण्यावर यांचा भर असतो. यामध्ये जनशक्तीचा रेटयाला अधिक महत्त्व असते. यामध्ये परिवर्तनासाठी आवश्यक असलेल्या क्रांतीकारी राजकीय जाणिवा व त्यानुसार क्रांतीकारी लढाई उभारणीत जास्त महत्त्व असते. त्याचप्रमाणे समाजातील स्पष्ट अनाविरोधावर आधारीत देखील विभाजन व त्यानुसार सर्वकष संघटनाला अग्रक्रम दिला जातो. वरील प्रकारात हा संघर्ष टाळण्याचा प्रयत्न असतो. तेव्हा वरील मार्गापैकी कोणता मार्ग देशाच्या दलितांनी स्विकारला ?

आतापर्यन्त म्हैशाळ प्रकल्पावर झालेल्या अभ्यासातून आपणास असे दिसते की देवलांनी पहिला मार्ग स्विकारला आहे. देशपांडे म्हणतात की संघर्षवादी मना प्रिय वाटणारा व झटपट यश देणारा क्रांतिकारी मार्ग देवलांनी नाकारून अधिक विधायक कृतीस प्रबोधन या वर भर दिला.

देवलांनी दलितामध्ये आधूनिकीकरणाची प्रक्रीया सुरु व्हावी म्हणून अनेक महत्त्वाच्या गोष्टी केल्यात त्यामध्ये प्रामुख्याने सरंजाम पध्दतीपासून ब्राम्हण सावकाराकडे दलीतांनी गहाण ठेवलेली जमिन ही देवलांनी सोडवली. दलीतांच्या शेतीवरील जवळपास १ लाख रुपये कर्ज देवलांच्या प्रयत्नाने सावकारांना परत करता आले व दलीतांची जमिन मुक्त करता आली या जमिनीची वैयक्तीक मालकी तुकड्या-तुकड्यात ही विभागलेली होती. बहूतेक निम्म्यापेक्षा जास्त जमातदारांची जमिन अर्ध्या एकरापेक्षा जास्त नव्हती शिवाय बहूतेक सर्व जमिन कोरडवाहू स्वरुपाची होती. इत्यादी गोष्टीमुळे वैयक्तीक पातळीवर शेती करणे किफायतशिर नव्हते ही गोष्ट देवलांच्या ध्यानात आली व त्यांनी संयुक्त शेतीची योजना दलीतांपुढे मांडली.

आमच्यामते देवलांचा जो विकासाचा मार्ग आहे तो म्हैशाळच्या दलीतांचे आधूनिकीकरण व त्यांची पारंपारिकता याच्या द्वंद्वात अडकलेला तो मार्ग आहे हा मुद्दा वरील विवेचनावरून आधूनिकता व वरवर दिसणा-या धर्मातील संकल्पनेच्या द्वंद्वात सापडलेला मार्ग आहे. देवल म्हैशाळच्या दलीतांचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न करतात, परंतु दलीतांना संपूर्ण खरोखरच्या धर्मातील संकल्पनेच्या परिघात व्यवहाराच्या पातळीवर आणू शकतात काय ? हा देवलांच्या समोरचा प्रश्न होता. संयुक्त शेतीची योजना

दलीतातर्फे मान्य झाली. सोसायटीच्या स्थापनेपासून शेतीमध्ये द्राक्ष, पानमळा ऊस इत्यादी सारखी नगदी पिके घेण्यास सुरुवात झाली. शेतीसाठी आवश्यक कसब दलीतांमध्ये नव्हते कारण शेती हा त्यांच्या पारंपारीक व्यवसाय नव्हता परंतु विठ्ठल सहकारी संस्थेमुळे कांही लोकात नवीन पध्दतीने शेती करण्याचे कसब आले आहे. शेतीमध्ये नवीन बीन्बीयाणे कसे वापरावे, रासायनिक खते कसे व किती वापरावे, ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीची मशागत कशी करावी इत्यादी गोष्टीचे शिक्षण संस्थेतर्फे दलीतांना मिळाले. शेतीच्या उपक्रमाशिवाय दूध सोसायटी, गृहनिर्माण सोसायटी, बालवाडया व इतर सांस्कृतीक कार्यक्रम वगैरे क्षेत्रात संस्थेच्या अहवालाप्रमाणे प्रगती झाल्याचे दिसून येते. परंतु दलीतांच्या आधूनिकीकरणाबरोबरच त्यांच्यामध्ये धर्मातील समतेवर आधारित जाणिवा निर्माण होऊ शकल्या काय ?

देवलांच्या अपेक्षेप्रमाणे शहरातील आधूनिकीकरण खेडयापर्यन्त नेताना खेडयातील नव्याने निर्माण होणारा तणाव ही आधूनिकीकरणाची प्रक्रिया टाळू शकली काय ? यावरील दोन्ही प्रश्नांचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल.

पहिल्यांदा सोसायटीच्या स्थापनेपूर्वीपासून या गावातील लोका-पर्यन्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलीत मुक्तीची चळवळ पोहोचलेली नव्हती या, गावातील महार मंडळी पंढरीच्या विठोबाचे भक्त होते, सोसायटी स्थापन झाल्यानंतर ही त्यांच्यातील धर्माबद्दलची कल्पना कमी झाली नाही. आज म्हैशाळच्या दलीतांनी त्यांच्या सोसायटीला दिलेल्या विठोबाच्या नावावरून सिध्द होते. शिवाय या दलीतांनी भिमराव आंबेडकरांच्या नावाने भजन मंडळ स्थापन केलेत परंतु गजर मात्र विठोबाचाच

चालल्याचे दिसून येते.

दुसरे असे की येथील दलीत युवकांना नवीन प्रशिक्षण देण्यासाठी व त्यांच्यातील नेतृत्व निर्माण करण्यासाठी कांही अभ्यास शिबीर म्हैसाळमध्ये घेण्यात आली या शिबीरातून दलीतांकडून दररोज देवाची उपासना म्हणून घेतली जात होती असे सोसायटीच्या अहवालात म्हटले आहे. उपासनेमध्ये पुढील वाक्य सभासदांकडून वदवून घेतले जायचे
" मी देव आहे, देव माझ्यातून व्यक्त होत असतो. " या उपासनेतून दलीतांना आणखी अंधश्रध्दाळू, बनवण्याची शक्यता नाकारता येत नाही. येथे मात्र दलीतांच्या आधुनिकीकरणात व दलीतांच्या पारंपारीक जाणिवात द्वंद्व दिसून येते.

दलीतांची आर्थिक परिस्थिती सुधारली व त्यामुळे दलीत दलीतेतरात एकात्मतेची भावना निर्माण झाली असे अभ्यासक व स्वत: देवलसुध्दा म्हणत होते असे जर झाले असते तर म्हैसाळमध्ये शिवसेना, हिंदू एकता, वीर सेवा दल या सारख्या जातीवर आधारीत संघटना कशाला निर्माण झाल्या असत्या. या प्रश्नाचे उत्तर विठ्ठल सहकारी सोसायटीच्या प्रयत्नातून मिळू शकते काय ? देवलांच्या आधुनिकीकरणातील व दलीतांच्या वाढत जाणाऱ्या पारंपारिकतेच्या संघर्षामुळे अशा शिवसेना, हिंदू एकता मधून अभिव्यक्त होणाऱ्या प्रवृत्ती वाढत जाणार शिवाय दलीतांतर्गत असमान जमिनीच्या मालकीतून वाढत जाणारी आर्थिक दरी म्हैसाळच्या प्रकल्प जोपर्यन्त जमिनीचे समान वाटप करीत नाही तोपर्यन्त कमी होणार नाही असे दिसते.